RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - ५ ] शनिवार, मे ७, २०२२ / वैशाख १७, शके १९४४ [ पृष्ठे ४

## असाधारण क्रमांक ५

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ अन्वये कलम १९ चे पोट-कलम (१) अन्वये घोषणापत्र.*

***घोषणापत्र***

क्रमांक भूसं-४/एसआर-८८९/कावि-४८९/२९४/२०२२.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, सातारा यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, कलम ११ अधिसूचना मौजे तरडफ, तालुका फलटण, एसआर क्रमांक ८८९/कावि-२४९, दिनांक १५ मार्च २०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-एक, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक गुरुवार ते बुधवार, मार्च २५-३१, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे आणि याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन-मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, सातारा यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ चे पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये वर्णन केलेप्रमाणे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाही म्हणून बाधित पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये वर्णन केलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, सातारा, भूमी संपादन भवन, जिल्हा न्यायालयासमोर यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा सातारा, तालुका फलटण, गाव तरडफ**

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | हे. आर | गट नंबर | गट नंबर | गट नंबर | गट नंबर |
| १ | ५९५ पै. | ०.९५ | ६०४ | ६४० | ५९६ | ५९५ पै. शिल्लक क्षेत्र. |
| २ | ६९१ पै. | ०.८८ | ६९७ | ६९० | ६९१ पै. शिल्लक क्षेत्र. | ६८७ पै. शिल्लक क्षेत्र. |
| | **एकूण ..** | **१.८३** | | | | |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** धोम-बलकवडी प्रकल्प.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :** धोम-बलकवडी प्रकल्प उजवा कालवा कि. मी. १०१ ते १०३.

**समाजाला मिळणारे लाभ :** (अ) धोम-बलकवडी प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुका ४३०० हेक्टर, फलटण तालुका १२७५० हेक्टर व पुणे जिल्ह्यातील भोर तालुका १०५० हेक्टर या दुष्काळी क्षेत्रास सिंचन लाभ होणार आहे.

(ब) सदर प्रकल्पामुळे सतत अवर्षणग्रस्त असणाऱ्या भोर, खंडाळा व फलटण तालुक्यांना पाण्याचा लाभ होऊन सुमारे एकूण १८१०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन शेतीला पाणी मिळणार आहे.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत.

सबब, पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक आहे.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसाहत व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश**

महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसूचना, दिनांक १३ मार्च २०१५ असा कलम ११, अधिसूचना प्रसिद्ध करताना उल्लेख करणेत आलेला आहे. त्याबाबतच पुढील पत्र ही वाचणेत येत आहे.

महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र. क्र. ६२/अ-३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ अन्वये धोम बलकवडी प्रकल्प, तालुका वाई, जिल्हा सातारा या प्रकल्पाकरिता भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील प्रकरण-२ मध्ये सामाजिक परिणाम निर्धारण (Social Impact Assessment) बाबतच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, सातारा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**शेखर सिंह,**

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, ७ मार्च २०२२.

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ अन्वये कलम १९ चे पोट-कलम (१) अन्वये घोषणापत्र.*

**घोषणापत्र**

क्रमांक भूसं-४/एसआर-८९२/कावि-९२/११८/२०२२.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, सातारा यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, कलम ११ अधिसूचना मौजे हिंगणगाव, तालुका फलटण, एसआर क्रमांक ८९२, दिनांक १९ जानेवारी २०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-एक, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ४-१०, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे आणि याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन-मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, सातारा यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे तसेच उपअधिक्षक भूमी अभिलेख, फलटण यांचे कार्यालयाकडून दिनांक ५ जानेवारी २०२२ रोजी प्राप्त झालेल्या जे.एम.पी. व जे.एम.सी. चे अवलोकन केले असता कलम ११ मध्ये प्रसिद्ध करणेत आलेल्या गट नंबर ९६१, क्षेत्र ०.३५ हे. आर मध्ये बदल होऊन गट नंबर ९६१ चे क्षेत्र ०.३८ हे. आर. व ०.०७ हे. आर असे एकूण ०.४५ हे. आर नमूद करणेत आलेले असलेने त्याप्रमाणे उक्त अधिसूचनेच्या अनुसूची-एक मध्ये बदल करणेत आलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १९ चे पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये या अधिसूचनेच्या अनुसूची-दोनमध्ये नमूद उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या उक्त जमिनींची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये वर्णन केलेप्रमाणे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाही म्हणून बाधित पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये वर्णन केलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, सातारा, भूमी संपादन भवन, जिल्हा न्यायालयासमोर यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**जिल्हा सातारा, तालुका फलटण, गाव हिंगणगाव**

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | हेक्टर/आर | गट नंबर | गट नंबर | गट नंबर | गट नंबर |
| १ | ९६१ | ०.३८ | ९६१ शिल्लक क्षेत्र. | ९६१ चे शिल्लक क्षेत्र. | ९६० | १५११ |
| २ | ९६१ | ०.०७ | १५१० | ९६१ चे शिल्लक क्षेत्र. | ९६१ चे शिल्लक क्षेत्र. | १५११ |
| | **एकूण ..** | **०.४५** | | | | |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव : धोम बलकवडी प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन : धोम बलकवडी उजवा कालवा सा. क्र. ७७/३२० मधील मायनर क्रमांक ३१.

**समाजाला मिळणारे लाभ :** (अ) धोम बलकवडी प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुका ४३०० हेक्टर, फलटण तालुका १२७५० हेक्टर व पुणे जिल्ह्यातील भोर तालुका १०५० हेक्टर या दुष्काळी क्षेत्रास सिंचनलाभ होणार आहे.

(ब) सदर प्रकल्पामुळे सतत अवर्षणग्रस्त असणाऱ्या भोर, खंडाळा व फलटण तालुक्यांना पाण्याचा लाभ होऊन सुमारे एकूण १८१०० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येऊन शेतीला पाणी मिळणार आहे.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत.

सबब, पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक आहे.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसाहत व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश**

महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसूचना, दिनांक १३ मार्च २०१५ असा कलम ११, अधिसूचना प्रसिद्ध करताना उल्लेख करणेत आलेला आहे. त्याबाबतच पुढील पत्र ही वाचणेत येत आहे.

महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र. क्र. ६२/अ-३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ अन्वये धोम बलकवडी प्रकल्प, तालुका वाई, जिल्हा सातारा या प्रकल्पाकरिता भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील प्रकरण-२ मध्ये सामाजिक परिणाम निर्धारण (Social Impact Assessment) बाबतच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक ४, सातारा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**शेखर सिंह,**

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, ६ जानेवारी २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.